# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक क्र.०७/ २०२१

**विषय: मार्च/एप्रिल,२०२१ (नियोजन जुलै/ऑगस्ट, २०२१) परीक्षांबाबत विद्यार्थ्यांकरिता मार्गदर्शक तत्वे व सूचना.**

१. विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार शैक्षणिक वर्ष २०२०—२१ च्या द्वितीय सम सत्रातील पदविका, पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या नियमित व अनुशेषित तसेच बहि:स्थ, श्रेणीसुधार B.A. to B.A., B.sc. to B.sc इत्यादींसाठी आवेदनपत्र भरलेल्या पात्र विद्यार्थ्यांच्या परीक्षांचे आयोजन दिनांक १२ जुलै, २०२१ पासून फक्त ऑनलाईन पध्दतीने टप्याटप्याने करण्यात आले आहे.

२. संबंधीत परीक्षांची वेळापत्रके www.unipune.ac.in या विद्यापीठ संकेतस्थळावर टप्प्याटप्प्याने प्रसिध्द करण्यात येत आहेत.

३. ऑनलाईन परीक्षेसाठी बहुपर्यायी प्रश्न (MCQ) असतील. यासाठी दिलेल्या ६० बहुपर्यायी प्रश्नांमधून ५० अचूक प्रश्नांची उत्तरे ग्राहय धरण्यात येतील. **विज्ञान, F.Y.BCA (Science) व अभियांत्रिकी** अभ्यासक्रमातील **गणित व संख्याशास्त्र** या विषयांसाठी एकूण ३० प्रश्न विचारले जातील व त्यामधील २५ अचूक प्रश्नांची उत्तरे ग्राहय धरली जातील.

४. वेळापत्रकामध्ये परीक्षांसाठीचा एकूण कालावधी (Session Period) दोन तासांचे एक सत्र (Session) (१२० मिनिटे) इतका जरी नमूद केलेला असला तरी दिलेल्या कालावधीमध्ये परीक्षा ही एक तासाची (६० मिनिटे) असेल. प्रत्यक्ष विद्यार्थ्यांने Login केल्यावर प्रश्नपत्रिका सोडविण्यासाठी एक तासाचा (६० मिनिटे) कालावधी असेल.

५. ऑनलाईन परीक्षेत काही तांत्रिक कारणाने खंड पडल्यास उर्वरित राहिलेलाच वेळ विद्यार्थ्यांना सॉप्टरवेअर मार्फत आपोआप वाढवून देण्यात येईल. यापूर्वी सोडविलेली उत्तरे ही आपोआप सेव्ह होऊन परीक्षा पुन्हा राहिलेल्या वेळासाठी सुरु होईल.

६. ऑनलाईन परीक्षांची माहिती होण्यासाठी अंतिम परीक्षा सुरु होण्यापूर्वी सराव परीक्षांचे आयोजन दिनांक ८ ते १० जुलै, २०२१ रोजी करण्यात आले आहे.

७. दिव्यांग विद्यार्थ्यांना शासन निर्णयाप्रमाणे सोयी व सवलती देय राहतील. तसेच या विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी २० मिनिटे अधिकचा वेळ देय राहील.

८. मा. विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार मार्च २०२१ नियोजन/जुलै/ऑगस्ट,२०२१ ऑनलाईन पध्दतीने आयोजलेल्या परीक्षांसाठी छायांकित प्रत व पूनर्मुल्यांकनाची सोय उपलब्ध राहणार नाही.

९. सदर ऑनलाईन परीक्षांच्या बाबतीत विद्यार्थ्यांना एस.एम.एस व ई—मेलद्वारे अवगत करण्यात येईल. मात्र यासाठी विद्यार्थ्यांच्या नोंदणीकृत ई—मेल आय.डी.व मोबाईल क्रमांक कार्यान्वित असणे आवश्यक आहे.

१०. सदर परीक्षेदरम्यान येणा—या अडचणी व शंकांचे निराकरण करण्यासाठी विद्यार्थ्यांनी sps.unipune.ac.in मध्ये लॉगीन करुन आपल्या तक्रारी नोंदवाव्यात.

११. खालील नमूद केलेल्या अडचणींसाठी तक्रार (Grivence) दाखल करता येईल.

| | |
|---|---|
| लॉगीन न होणे/अचानक लॉगआऊट होणे व पुन्हा लॉगीन न करता येणे. | Not Able to Login, Logged Out & not able to Login again |
| इंग्रजी/मराठी माध्यम प्रश्नपत्रिका उपलब्ध न होणे | English /Marathi Version Question Paper not displayed |
| आकृत्या न दिसणे | Images not Displayed |
| चुकीच्या प्रश्नपत्रिका उपलब्ध होणे. | Wrong Question Paper Displayed |
| पेपर सबमिट न होणे. | Unable to Submit Answer Papers |
| विद्यार्थ्यांस परीक्षेच्यावेळी कोविड विषाणूची बाधा झाली असणे. | Covid Issue |
| विद्यापीठ आयोजित दोन विषयांच्या परीक्षा एकाच दिवशी एकाच वेळी येणे अथवा विद्यापीठ परीक्षा व सीईटी,सी.ए. सी.एस किंवा तत्सम स्पर्धा परीक्षा एकाच दिवशी एकाच वेळी येणे. | Overlap with other exam |

उपरोक्त कारणांसाठी Stuents Profile System (sps.unipune.ac.in) मधून योग्य पुराव्यासह दाखल केलेल्या तक्रार अर्जांची छाननी करुन सत्यता पडताळणी केली जाईल व त्यानंतर तक्रारीमध्ये तथ्य असलेल्या पात्र विद्यार्थ्यांच्या परीक्षांचे फेरआयोजन करण्यात येईल. सबब, ज्यांनी तक्रार दाखल केली त्या सर्व विद्यार्थ्यांची फेर परीक्षा घेतली जाईलच असे नाही याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी. तसेच तक्रार दाखल केलेल्या विद्यार्थ्यांनी :—

१) ६० प्रश्नांपैकी ४० किंवा त्यापेक्षा जास्त प्रश्न सोडविले असल्यास

**अथवा**

२) विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेतील गणित व संख्याशास्त्र विषयांसाठी असलेल्या एकूण तीस प्रश्नांच्या प्रश्नपत्रिकेतील २० किंवा त्यापेक्षा जास्त प्रश्न सोडविले असल्यास अशा विद्यार्थ्यांची संबंधित विषयाची पूर्नपरीक्षा आयोजित करण्यात येणार नाही.

१२. विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते की, प्रश्नपत्रिकेमधील प्रश्नांचे उत्तर देण्यासाठी पर्याय निवडल्यानंतर योग्य पर्याय निवडणे आवश्यक आहे. पर्यायाचे बटण न दाबता त्या समोरील टेक्स्ट किंवा आकृती वर क्लिक केल्यास विद्यार्थ्यांनी निवडलेल्या पर्यायाची नोंद होत नाही. सबब, विद्यार्थ्यांनी आपण नोंदविलेल्या सर्व प्रश्नांची उत्तरे नोंदवली गेली आहेत याची तपासणी करुनच उत्तरपत्रिका कायम (सबमिट) करावी.

१३. ऑनलाईन परीक्षेअगोदर, परीक्षेदरम्यान किंवा नंतर विद्यार्थ्याने परीक्षा गैरप्रकार केल्याचे आढळल्यास सदर विद्यार्थी विद्यापीठ अध्यादेश क्र. ०९ नुसार कारवाईस पात्र असेल.

मा. प्राचार्य/संचालक/महाविद्यालयीन परीक्षा अधिकारी यांना विनंती करण्यात येते की, वर निर्देशित मार्गदर्शक तत्वे व सूचनांचे अवलोकन करून याबाबत आपल्या महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी यांना आपल्या स्तरावरून सूचित करावे व त्यांच्या शंकांचे निरसन करून विद्यापीठास सहकार्य करावे.

कळावे,

संदर्भ :— परीक्षा—समन्वय/१८८

दिनांक:—०९ जुलै, २०२१

संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रति,
मा. प्राचार्य / संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था,
पुणे, अहमदनगर, नाशिक जिल्हा.